# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/०१/२०२५ (शुरूवार)**

**Morning**

---

**लोहा चोरी करणारा आरोपी अटक**
**स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई**

**पोलीस स्टेशन कुही :—** दिनांक २१.०१.२०२५ रोजी फिर्यादी जिवन सुरेश वाघ वय ३५ वर्ष रा प्लॉट न ४३ ओंम सदगुरु नगर नरसाळा नागपूर यांनी पोलीस स्टेशन कुही येथे रिपोर्ट दिली की, फिर्यादी चे घराचे बांधकाम हुडेकश्वर रोड वरील मौजा धामना शिवार येथे प्लॉट न ३५ येथे दि ०१.१०.२०२४ सुरु असून बांधकाम सूरु असलेल्या घरासमोरील खाली जागेवर ७ टन लोहा टाकलेला होता घराचे बांधकाम पूर्ण झाल्या नंतर स्लॅप टाकण्याकरीता उरलेला अडीच टन लोहा समोरील खाली जागेत होता. दिनांक २०.०१.२०२५ चे रात्री १२.००वा ते २१.०१.२०२५ चे ०५.००वा चे दरम्यान कोणतरी अज्ञात चोराने फिर्यादीने घरबांधकाम साठी आणलेला अडीच टन लोंहा किंमत ६२०००/— रूपये चोरून नेला अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कुही येथे कलम ३०३**(२) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे.**

स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण जिल्हा चे पथक सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत आरोपीचा शोध घेत असातांना दि ३०.०१.२०२५ रोजी गोपनीय बातमीदारा कडून मिळालेल्या माहिती वरून व तांत्रिक माहिती वरून कमाल चौक नागपुर येथे गुन्हात वापरलेले वाहन व मुद्देमाल असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली त्यामुळे स्थागुशा नागपुर ग्रामीण च्या पथकाने आरोपींचा शोध घेतला असता गुन्हयात वापरलेला SML स्वराज मजदा मालवाहु वाहन क्र एम ३१ डी एस ७५८५ व त्यामध्ये चोरीस गेलेला बांधकामा करिता वापरला जाणारा लोहा किंमत ६२०००/— रूपये चा कमाल चौक नागपुर येथून मिळून आल्याने स्वराज मजदा वाहनावर काम करणारा देवकुमार कुशवाह यास विश्वासात घेऊन विचारपूस केली असता. आरोपी देवकुमार कुशवाह आणि त्याच्या साथीदाराने मिळुन गुन्हा केल्याची माहीती हाती लागली. आरोपीच्या ताब्यात घेऊन त्याच्या ताब्यातुन गुन्हातील वापरलेले वाहन SML स्वराज मजदा मालवाहु वाहन क्र एम ३१ डी एस ७५८५ व बांधकाम लोहा की ६२,००० /— रु असा एकूण मुद्देमाल ४,६२,०००/— रूपये चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमूद ०१ आरोपी याची मेडिकल तपासणी करून पो.स्टे. कूहि यांचे ताब्यात पुढील कार्यवाही कामी देण्यात आले.कुही पोलीसांनी आरोपीस अटक केले आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोस्टे भिवापुर :—** दिनांक ३०/०१/२०२५ रोजी भिवापुर पोलीस हे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की अवैधरीत्या विनापरवाना रेती वाहतुक केली जात आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून भिवापुर टाऊन येथे नाकाबंदी केली असता असतांना महींद्रा ट्रॅक्टर क्र. एमएच ३६— एल — २६४५ यास थांबवुन पाहणी केली असता चालक नामे जयंत हरीदास डडमल वय २२ वर्ष रा. गरडापार ता चिमुर जि चंद्रपुर हा मिळुन आला . तसेच ट्रॅक्टर मध्ये ०१ ब्रास रेती कि.५०००/—रू असल्याचे आढळुन आले. चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असात त्याने परवाना नसल्याचे सांगितले. **आरोपीच्या ताब्यातील** महींद्रा ट्रॅक्टर क्र. एमएच ३६— एल — २६४५ **आणि ०१ ब्रास रेती असा एकूण ५५,५०,००/—रू चा पंचासमक्ष मुद्देमाल जप्त केला.**

चालक आरोपी नामे जयंत हरीदास डडमल वय २२ वर्ष रा. गरडापार ता चिमुर जि चंद्रपुर याच्या विरुद्ध पोलीस ठाणे भिवापुर येथे कलम ३०३(२),४९,३(५), भा.न्या.स सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४,२१ खन आणि खनिज अधि. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोस्टे पारशिवणी :—** दिनांक ३०/०१/२०२५ रोजी पारशिवणी पोलीस हे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की अवैधरीत्या विनापरवाना रेती वाहतुक केली जात आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा तामसवाडी शिवारातील पारशिवनी ते खापरखेडा रोड ग्रम्स ब्रिक्स कंपनी चौका जवळ नाकाबंदी केली असता असता टिप्पर ट्रक क्र..एमएच ३६ एफ ३०२७ यास थांबवुन पाहणी केली असता चालक नामे असगर याकुब शेख वय ५० वर्ष रा. बिना संगम, मस्जिद जवळ, ता.कामठी हा मिळुन आला टिप्परची पाहणी केली असता त्यात ०४ ब्रास रेती असल्याचे आढळुन आले. चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असात त्याने परवाना नसल्याचे सांगितले.आरोपीला वाहन मालकाचे नाव विचारपुस केली असता त्याने साबीर युसुफ टेले रा. बिना संगम ता.कामठी असे सांगितले. **आरोपीच्या ताब्यातील** ट्रक क्र.एमएच ३६ एफ ३०२७ किंमत १५,००, ०००/— , ४ ब्रॉस रेती किंमत रू २००० प्रमाणे एकुण १५,०८,०००/— चा माल **पंचासमक्ष मुद्देमाल जप्त केला.**

चालक आरोपी नामे असगर याकुब शेख वय ५० वर्ष रा. बिना संगम, मस्जिद जवळ, ता. कामठी याच्या विरुद्ध पोलीस ठाणे पारशिवणी येथे ३०३(२),४९ भा.न्या.सं.सहकलम ४८(७)(८) महा.जमीन व महसूल अधि.सह कलम ४,२१ खान व खनिज अधि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर